
# भीम जयंतीत नगर पालिकेचे गलिच्छ राजकारण

# मनाची नाही तर जनाची ठेवून..बीड नगराध्यक्ष पारवे, स्वच्छता सभापती शेख निजाम यांनी राजीनामा द्यावा







बीड (सरकार) भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती प्रसंगी काढण्यात येणाऱ्या मिरवणूक मार्गावर घाण पाणी सोडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या व समाज बांधवांना रस्त्यावर बारीक चरखडी टाकून जखमी करण्यास कारणीभूत असलेल्या नगर परिषद अधिकाऱ्यासह बीड नगर परिषद नगराध्यक्षा प्रेमलता पारवे व स्वच्छता सभापती शेख निजाम यांनी याप्रकरणी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा अशी मागणी रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी केली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मिरवणुकी दरम्यान घाणपाणी सोडून आंबेडकरांचा अवमान करण्यास नगर परिषद अधिकाऱ्यांसह नगराध्यक्षा व स्वच्छता सभापती सुद्धा तितकेच जबाबदार आहेत. बीड नगर पालिकेचा निष्काळजीपणा जयंती उत्सवाला गालबोट लावणारा आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती प्रसंग घडलेल्या सर्व घटनांना नगर परिषद प्रशासन नगराध्यक्ष व स्वच्छता सभापती जबाबदार आहेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती उत्सवात आंबेडकरी अनुयायांना वेठीस धरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमानास कारणीभूत असणाऱ्या नगराध्यक्ष प्रेमलता पारवे व स्वच्छता सभापती शेख निजाम यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड,मझरखान, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, महेश आठवले, श्याम वीर, विलास जोगदंड, संभाजी गायकवाड, सिद्दीक फारोकी, अक्षय कोकाटे, महेंद्र वडमारे, सचिन वडमारे, भैय्या साळवे, भैय्या मस्के, पप्पू वाघमारे, आप्पा मिसळे, संजय हनवते आदींनी केले आहे.


beedsarkar

संपादक-आदोडे साहस


E-mail : beedsarkar @ Gmail.com

E-mail : beedsarkar @ Gmail.com किंमत: १ रू. पाने : ४

# बीडसरकार

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १३ वे ■ अंक १४८ ■ शुक्रवार १७ एप्रिल २०२६ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल दि.१८ एप्रिल २०२६ ■ पाने ४ ■ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 13 ■ Issu 148 ■ Friday 17 April 2026 ■RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027



# वाळू टेंडरच्या नावाखाली गोदावरीत नंगानाच!रात्रंदिवस उपसा सुरू

## तहसीलदार खोमणे यांच्या अर्थपूर्ण दुर्लक्ष ; जिल्हाधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज

## डीवायएसपी कटके साहेब, वाळू माफियावर कारवाई करण्याची हिंमत होईना का?

गेवराई (सरकार): तालुक्यातील गोदावरी नदी पात्रात सध्या वाळू टेंडरच्या नावाखाली अक्षरशः नंगानाच सुरू असल्याचे चित्र समोर आले आहे. राक्षसभुवन, बोरगाव, सुरळेगाव, पांचाळेश्वर, गुतेगाव, सावरगाव आणि सावळेश्वर परिसरात दिवस-रात्र जेसीबी, केन्या लोडर व पोकलेनच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रात्रीच्या अंधारात मोठ्या यंत्रसामग्रीच्या साहाय्याने नदी पात्र खोदून वाळू उपसा केला जात आहे. यामुळे नदीचा नैसर्गिक प्रवाह बिघडत असून पर्यावरणालाही मोठा धोका निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांच्या विहिरींच्या पाण्याची पातळी कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या सर्व प्रकाराकडे संबंधित प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे. तहसीलदार खोमणे व डीवायएसपी कटके यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून, इतक्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या अवैध उपशाकडे त्यांनी का डोळेझाक केली आहे, असा सवाल नागरिक करत आहेत.

विशेष म्हणजे, या भागात वाळू माफियांचा प्रभाव वाढत चालला असून, नियमांची पायमल्ली करून खुलेआम उपसा सुरू आहे. शासनाच्या नियमांना केराची टोपली दाखवत महसूल व पोलीस यंत्रणा मूकदर्शक बनल्याचे चित्र आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी तातडीने लक्ष घालून या प्रकाराची चौकशी करावी व अवैध वाळू उपसा तात्काळ बंद करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे. अन्यथा पर्यावरणाचा समतोल बिघडून भविष्यात मोठे संकट ओढवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### चकलांबाचे सपोनि सचिन इंगळे; नावालाच कारवाई, प्रत्यक्षात शून्य ;उचल बांगडी करण्याची मागणी



चकलांबा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये अवैध वाळू उपसा, दारू, जुगार व इतर गैरप्रकारांवर कारवाई होत नसल्याने सपोनि सचिन इंगळे यांच्या कार्यपद्धतीवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. केवळ कागदोपत्री कारवाई दाखवून प्रत्यक्षात काहीच होत नसल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. वाढत्या अवैध धंद्यांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असून, संबंधित अधिकाऱ्यांनी ठोस पावले उचलण्यात अपयश आल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सपोनि इंगळे यांची तत्काळ उचल बांगडी करून कडक कारवाई करणारा अधिकारी नेमावा, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे.

# केस पिकले,शरीर थकले,प्रकृती बिघडली

## रुग्णालयात नेताना वाल्मिक कराडचं नव रुप समोर

बीड (सरकार): जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणात अटक करण्यात आलेला मुख्य आरोपी वाल्मिक कराडची प्रकती बिघडली असून उपचारासाठी त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सध्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून त्याची तपासणी सुरू असून तपासणीनंतरच त्याच्या प्रकृतीबाबत डॉक्टरांकडून निर्णय घेण्यात येईल. दरम्यान, यापूर्वी अनेकवेळ वाल्मिकचा जामीन अर्ज फेटाळल्याने त्याचा तुरुंगातील मुक्काम वाढला आहे.


आरोपी वाल्मीक कराडला अस्वस्थ वाटू लागल्याने आज सकाळी मोठ्या पोलीस बंदोबस्तात रुग्णालयात दाखल करण्यात आले. जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांकडून आरोपी वाल्मीक कराडच्या चाचण्यासंदर्भात प्रक्रिया सुरू आहे. यावेळी, रुग्णालयाबाहेर मोठा बंदोबस्त तैनात होता. तर, वाल्मिक कराडचे



कार्यकर्तेही रुग्णालयाबाहेर गर्दी करुन उभे होते. दरम्यान, संतोष देशमुख हत्याप्रकरणात वाल्मिक कराडचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला असून त्याच्यावरील सुनावणी न्यायालयात सुरू आहे.दिवंगत सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणाला जवळपास दीड वर्षाहून अधिक काळ पूर्ण होत आला असून सध्या न्यायालयात खटला सुरू आहे. याप्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिकसह ५ जण अटकेत असून कृष्णा आंधळे हा आरोपी अद्यापही फरार आहे. मात्र, काही दिवसांपूर्वीच तो बीडमध्ये येऊन गेल्याचा आरोप दिवंगत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी केला होता. वाल्मिक कराडची तरुंगाबाहेर येण्यासाठी धडपड सुरू असून दिल्लीत, सर्वोच्च न्यायालयात देखील वाल्मिक कराडचा जामीन फेटाळण्यात आला आहे. वाल्मिकने सातत्याने जामीनासाठी अर्ज केला होता. मात्र, आधी सत्र न्यायालय, पुन्हा उच्च न्यायालय आणि आता सर्वोच्च न्यायालयाने देखील वाल्मिकचा जामीन फेटाळला. त्यानंतर, वाल्मिकच्या मुलानेही फेसबुक पोस्ट करत दु:ख व्यक्त केलं होतं.

# परळीत रेल्वे पोलीसाची आत्महत्या

परळी (सरकार) परळी वैजनाथ रेल्वे स्थानकावर कर्तव्यावर असलेल्या एका तरुण रेल्वे पोलीस जवानाने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना घडली आहे. आज दिनांक १७ रोजी सकाळी ही घटना उघडकीस आली.



नितीन पंडित ढगे (रा. लोहारा, जि. धाराशिव) असे या मृत जवानाचे नाव आहे. जीवन संपवण्यामागे काय कारण आहे हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

नितीन ढगे हे लोहारा (जि. धाराशिव) येथील रहिवासी होते आणि सध्या परळी वैजनाथ येथे लोहमार्ग पोलीस (ऋळझ) दलात कार्यरत होते. मिळालेल्या माहितीनुसार, सप्टेंबर २०२४ मध्ये ते नोकरीस लागले होते. त्यांनी परळीतील माधवबाग परिसरातील एका 'प्ले रूम'मध्ये (खेळायची खोली) गळफास घेऊन जीवन संपवले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. नितीन यांचा विवाह अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला होता. ७ मे रोजी त्यांचा विवाह संपन्न होणार होता. काही दिवसांपूर्वीच त्यांचा साखरपुडा मोठ्या उत्साहात पार पडला होता. घरात लग्नाची लगबग आणि आनंदाचे वातावरण असतानाच, नितीन यांनी अचानक हे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# सरकारी कर्मचाऱ्यांना आता मोठी घरे!

## ४५० ते २५०० चौरस फुटांचे क्षेत्रफळ

मुंबई (सरकार): सरकारी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या संरचनेत तब्बल २२ वर्षांनंतर बदल करण्याचा निर्णय राज्य सरकारकडून घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार सरकारी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या घरांचे क्षेत्रफळात १०० चौरस फुटांपासून ते ७०० चौरस फुटांपर्यंत वाढ झाली आहे. सनदी अधिकाऱ्यांच्या घरांचे क्षेत्रफळ हे २५०० चौरस फूट तर सर्वात कमी वेतनगटाचे घर ४५० चौरस फुटांपर्यंत करण्यात आले आहे. यामध्ये देवघरापासून ते कार्यालय कक्ष, प्रवेशद्वार कक्षांचाही समावेश करण्यात आला आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांच्या घरांसाठी विविध वेतनगटांनुसार शासकीय कर्मचारी निवासस्थानांचे चटईक्षेत्रफळ २००४ साली निश्चित करण्यात आले होते. मात्र मागील २२ वर्षांत राहणीमानात झालेले बदल, वाढलेल्या गरजा, जीवनमानातील बदल तसेच नवीन बांधकाम तंत्रज्ञान या सर्वांचा विचार करून या घरांच्या संरचनेत बदल करण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडून घेण्यात आला.

त्यानुसार या घरांची संरचना आणि क्षेत्रफळ ठरविण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली होती. या समितीने सातव्या वेतन आयोगानुसार विविध वेतनगटांनुसार घरांची संरचाना आणि क्षेत्रफळ निश्चित केले आहे. सध्या असलेली शासकीय निवासस्थाने १८०० चौरस फुटांपासून ते ३४० चौरस फुट क्षेत्रफळापर्यंत मर्यादित आहेत. मात्र नवीन घरांचे क्षेत्रफळ हे २४०० चौरस फुटांपासून ४५० चौरस फुटांपर्यंत वाढविण्यात आले आहे.

वेतनगट एस-३१ ह्न २४०० चौरस फूट चटई क्षेत्र, एस-२७ ते एस-३० ह्न २००० चौरस फूट, एस-१९ ते एस-२६ ह्न १६०० चौरस फूट, एस-१३ ते एस-१८ ह्न १००० चौरस फूट, एस-९ ते एस-१२ ह्न ७०० चौरस फूट, एस-५ ते एस-८ ह्न ६०० चौरस फूट, एस-१ ते एस- ४ या वेतनगटाला ह्न ४५० चौरस फूट चटई क्षेत्रफळाचे घर उपलब्ध होणार आहे.हा निर्णय भविष्यात करण्यात येणाऱ्या नवीन शासकीय निवासस्थानांच्या बांधकामांसाठी लागू करण्यात आला आहे. यापूर्वी वाटप करण्यात आलेली शासकीय निवासस्थाने तसचे सद्यस्थितीत बांधकामाधीन असलेली शासकीय निवासस्ताने यांच्या संभाव्य वाटपात कोणतेही बदल करण्यात आलेले नसल्याचे याविषयी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काढण्यात आलेल्या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. २३ फेब्रुवारी रोजी उच्चस्तरीय सचिव समितीने या निर्णयाला मान्यता दिली.

## संपादकीय

# मराठवाड्यात विक्रमी तापमान

जगातील पहिल्या १० उष्ण शहरात विदर्भातील तीन जिल्हयांचा समावेश झालेला असतांशना देशातील पहिल्या दहा उष्ण शहरात मराठवाड्यातील बीडचा समावेश झाला आहे. तसेच मराठवाड्यातील हिंगोली येथे एका तीस वर्षीय इसमाचा उष्माघाताने मृत्यू झाला. एप्रिल महिन्यातच मराठवाड्यात उष्णतेचा तडाखा बसल्याने आणखी पुढील दीड ते दोन महिने कसे जातील, या विचारात अनेकजण आहेत. मराठवाड्यात उष्णतेची लाट दिवसेंदिवस वाढतच आहे. येत्या चार दिवसांत आणखी उष्णता वाढणार असल्याचे राज्य शासनाच्या हवामान विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी सर्वाधिक तापमान परभणी जिल्ह्यात राहत असे; परंतु आता बीड व नांदेड जिल्ह्याने यामध्ये सर्वाधिक तापमानाची नोंद असलेला जिल्हा म्हणून एक वेगळी ओळख करून दिली आहे. देशातील पहिल्या १० उष्ण शहरांपैकी मराठवाड्यातील बीडच्या ४३.१ अंश तापमानाची नोंद झाली आहे. मराठवाड्यात सर्वत्रच चाळिसी पार अशी तापमानाची नोंद सध्या आहे. बीडमध्ये ४३, तर नांदेड जिल्ह्यात तापमानाने ४२ डिग्री एवढी नोंद घेतली आहे. वाढत्या तापमानामुळे मराठवाड्यातील नागरिक हैराण आहेत. दरम्यान वाढत्या उष्णतेमुळे हिंगोलीत उष्माघाताचा एक बळी गेल्याची नोंद आहे. हिंगोली बस स्थानक परिसरात एकाचा मृतदेह आढळला होता. हिंगोली शहर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी शासकीय

**मराठवाड्यात विक्रमी तापमानाचा बळी**

मराठवाड्यात उष्णतेची लाट आणि कडक उन्हाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे, विशेषतः बीड, लातूर आणि धाराशिवसह मराठवाड्याच्या अनेक भागांत तापमान वाढून उष्ण व दमट हवामानाची शक्यता आहे. दुपारच्या वेळी काळजी घेण्याचे आणि भरपूर पाणी पिण्याचे आवाहन हवामान विभागाने केले आहे. एकीकडे उन्हाची तीव्रता, चटके व दुसरीकडे वेळी-अवेळी महावितरणची वीज गुल होण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. दिवसा व रात्री कधीही अनेक तास भारनियमन केले जात आहे. यामुळे नागरिकांचा त्रास अधिक वाढला आहे. रुग्णालयात पाठविला. रफिक शेख उस्मान असे त्या मयत इसमाचे नाव असून तो ३० वर्षांचा होता. उत्तरीय तपासणीनंतर डॉक्टरांनी त्या इसमाचा मृत्यू उष्माघातामुळे झाला, असे स्पष्ट केले. सदरील इसम दोन दिवसांपूर्वी मुलाला सोडण्यासाठी हिंगोली येथे आला होता; परंतु तो इसम घरी न परतल्याने कुटुंबीयांनी त्याचा शोध सुरू केला; परंतु तो उष्माघातामुळे मरण पावल्याचे कळताच कुटुंबीयांच्या पायाखालची जमीन सरकली. मराठवाड्यात वाढती उष्णता जीवघेणी ठरत असून उष्माघाताचा बचाव करण्यासाठी नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात येत आहे. मागच्या वर्षाच्या तुलनेत अधिक कडक असल्याचे जाणवत आहे. सकाळी दहा ते अकरा वाजण्याच्या सुमारासच उन्हाचे यंदा उन्हाळा कडक चटके जाणवत आहेत. एकीकडे उन्हाची तीव्रता, चटके व दुसरीकडे वेळी-अवेळी महावितरणची वीज गुल होण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. दिवसा व रात्री कधीही अनेक तास भारनियमन केले जात आहे. यामुळे नागरिकांचा त्रास अधिक वाढला आहे. सदरील भारनियमन अघोषित असून त्याचाच सर्वाधिक फटका नागरिकांना बसत आहे. मराठवाड्याचा पारा ४० अंशांच्या पुढे सरकल्याने त्याच्या झळा बाजारपेठेतही दिसून येत आहेत. पालेभाज्यांनाही उन्हाचा तडाखा बसला असून आवक रोडावल्याने भाज्यांचे भाव वाढले आहेत. बाजारात पालक, मेथी, कोथिंबीरचे दर वाढले आहेत, तर मोजक्या प्रमाणात करडी व चुका येत आहे. एका जुडीमागे वीस रुपये आकारले जात आहेत. बाजारात पत्ताकोबी, फुलकोबी, भेंडी, गवार, शेवगा, दिलपसंद दुधी भोपळा, लाल भोपळा, दोडके, वांगी आदींचा भाव हा शंभर रुपये किलोपर्यंत स्थिरावला आहे. केवळ मराठवाड्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात पुढील चार दिवस अत्यंत धोक्याचे असणार आहेत. मुंबईसह कोकण किनारपट्टीवर उष्ण आणि दमट वातावरण कायम राहणार आहे. त्याच्या झळा मराठवाड्यालाही पोहोचणार आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील तापमान ४३ अंशांच्या पुढे देखील जाणार असल्याचे प्रशासनाच्यावतीने कळविण्यात आले आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. भरपूर पाणी पिणे, हलके कपडे घालणे आणि थेट उन्हात जास्त वेळ न थांबणे या गोष्टीचे पालन करणे आवश्यक आहे. मराठवाड्यात सर्वत्रच दुपारच्या वेळी संचारबंदीसारखा शुकशुकाट दिसून येत आहे. रात्री उशिरापर्यंत उष्णता जाणवत आहे. उन्हाच्या प्रखर लाटेने मराठवाडा अक्षरशः भाजून निघत आहे. आठही जिल्ह्यांत एप्रिल महिन्यातच अशी परिस्थिती असल्याने आणखी मे व जून महिना उष्णतेच्या बाबतीत कसा असेल यावर चर्चा व भीती व्यक्त केली जात आहे. शेतकरी वर्ग शेतातील कामे सकाळीच उरकून घेत आहेत. सकाळी दहाच्या नंतर शेतात थांबणे शक्य होत नसल्याने पहाटे पाच वाजताच शेतकरी वर्ग कामाला लागत आहे. स्वतःची शेती असणारा शेतकरी भल्या पहाटे उठून शेतात कामाला लागत आहे; परंतु तेवढ्या सकाळी शेतात कामावर येण्यासाठी मजूर मिळत नसल्याने अनेकांची गैरसोय होत आहे. या वाढत्या उष्णतेबरोबरच १९ एप्रिलनंतर राज्यातील काही जिल्ह्यांत अवकाळी पाऊस पडणार असल्याचे संकेत दिले जात आहेत. कडक उन्हाळा व अधून मधून पडणारा अवकाळी पाऊस यामुळे लहान मुलांसह ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य मात्र बिघडत आहे.

# लोकशाहीचा नवा अध्याय



भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. मात्र इथे महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व अजूनही समाधानकारक नाही. लोकसंख्येच्या जवळपास अर्धा भाग असलेल्या महिलांचा निर्णयप्रक्रियेत सहभाग अत्यल्प आहे. या पार्श्वभूमीवर महिलांसाठी राजकीय आरक्षण हा मुद्दा दीर्घकाळ चर्चेत राहिला. अलीकडील घडामोडींमुळे तो पुन्हा केंद्रस्थानी आला. भारताची लोकशाही सतत बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि लोकसंख्यात्मक वास्तवाशी जुळवून घेत पुढे जाते. या पार्श्वभूमीवर प्रस्तावित संविधान (१३१वे दुरुस्ती) विधेयक, २०२६ हे अत्यंत महत्त्वाचे आहे. या विधेयकाद्वारे लोकसभेच्या जागा वाढवणे आणि ३३ टक्के महिला आरक्षण लागू करणे या उद्देशाने हे विधेयक मांडले. त्यामुळे भारतीय संसदीय व्यवस्थेच्या रचनेत आणि प्रतिनिधित्वाच्या स्वरूपात मूलभूत बदल घडू शकतात; मात्र लोकसभेच्या जागा ५४३ वरून ८५० करण्यात येत असल्याने उत्तर भारतातील जास्त लोकसंख्या असलेल्या राज्यांना अधिक जागा मिळण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे महिला सक्षमीकरणाच्या आड दक्षिणेकडील राज्यांचे प्रतिनिधित्व कमी करण्याचा डाव तर नाही ना, असा आक्षेप घेतला जात आहे.

महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण हा सकारात्मक आणि आवश्यक निर्णय असला तरी त्याची अंमलबजावणी जनगणना आणि परिसीमनाशी जोडल्याने मोठा अडथळा ठरत आहे. या संपूर्ण प्रक्रियेवर काही राजकीय टीकाही होत आहे. काही विश्लेषकांच्या मते, महिला आरक्षणाचा मुद्दा पुढे करून प्रत्यक्षात परिसीमनाच्या मोठ्या बदलांना स्वीकारार्ह बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. तर काहींचे मत आहे की, या निर्णयामागे आगामी निवडणुकांमध्ये राजकीय फायदा मिळवण्याची रणनीती असू शकते. विरोधकांच्या या शंकांना उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेत म्हणाले, की विकसित भारत म्हणजे केवळ रस्ते, रेल्वे किंवा पायाभूत सुविधांची आकडेवारी नव्हे, तर धोरण निर्मितीत महिलांना भागीदार बनवणे महत्त्वाचे आहे. तसेच जे लोक केवळ राजकीय फायद्याचा विचार करून या विधेयकाचा विरोध करत आहेत, त्यांना पंतप्रधानांनी इशारा दिला की, आता महिला केवळ लाभार्थी नाहीत, तर त्या स्वतःचे मत मांडत आहे. तसेच वेळप्रसंगी आपल्या हक्कांसाठी आवाज उठवत आहे. सध्या लोकसभेत ५४३ सदस्य आहेत, तर संविधानाने कमाल मर्यादा ५५० निश्चित केली. नव्या प्रस्तावानुसार ही मर्यादा वाढवून ८५० करण्यात येणार आहे, ज्यामध्ये ८१५ जागा राज्यांसाठी आणि ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी असतील. ही वाढ केवळ संख्यात्मक बदल नसून ती भारतातील बदलत्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व अधिक अचूकपणे करण्याचा प्रयत्न आहे.

आता परिसीमन म्हणजे लोकसंख्येनुसार मतदारसंघांची पुनर्रचना करणे. या प्रक्रियेमुळे प्रत्येक मतदारसंघातील लोकसंख्या साधारण समान राहते आणि प्रतिनिधित्व अधिक न्याय्य होते; मात्र, याच मुद्द्यावरून वाद निर्माण झाला. दक्षिण भारतातील राज्यांनी या प्रस्तावाला तीव्र विरोध दर्शवला. कारण त्यांनी लोकसंख्या नियंत्रणात यश मिळवले, तर उत्तर भारतातील काही राज्यांमध्ये लोकसंख्या वाढली. जर जागांचे वाटप लोकसंख्येच्या प्रमाणात केले गेले, तर उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या राज्यांना अधिक जागा मिळतील आणि दक्षिणेकडील राज्यांचे प्रतिनिधित्व तुलनेने कमी होईल. मात्र या विधेयकाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण होय. सध्या लोकसभेत महिलांचे प्रतिनिधित्व केवळ १४ टक्के आहे, जे जागतिक सरासरीपेक्षा कमी आहे. स्वीडन, नॉर्वे आणि दक्षिण आफ्रिका यांसारख्या देशांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व ४० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. विशेष म्हणजे, या देशांमध्ये संसदेत थेट आरक्षण नसतानाही राजकीय पक्ष त्यांच्या पातळीवर महिला उमेदवारांना प्राधान्य देतात. याउलट, भारतात महिलांना तितकी समान संधी मिळत नाही. यावरून असे दिसते की, महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी कायदेशीर तरतुदींबरोबरच पक्षांतर्गत सुधारणा आणि सामाजिक बदल आवश्यक आहे. केंद्र सरकार त्या आनुषंगाने सकारात्मक प्रयत्न करीत आहे. महिलांना निर्णय प्रक्रियेत अधिक संधी मिळावी, राजकारण अधिक समावेशक व्हावे यासाठी हे आरक्षण आवश्यक मानले जाते. खरंतर महिलांसाठी लोकसभा व विधानसभेत आरक्षण देण्याचे अनेक प्रयत्न झाले. अनेकवेळा विधेयके मांडली गेली; परंतु ती लागू होऊ शकली नाहीत. लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व अजूनही अत्यंत कमी आहे. १७व्या लोकसभेत महिलांचे प्रमाण सुमारे १४.३ टक्के होते, तर १८व्या लोकसभेत हे प्रमाण आणखी थोडे कमी झाले. ही परिस्थिती लक्षात घेता महिलांना राजकारणात समान संधी देण्यासाठी आरक्षणाची गरज अधोरेखित होते. १९९३ मध्ये झालेल्या ७३व्या आणि ७४व्या घटनादुरुस्तींमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी एक-तृतीयांश जागा आरक्षित केली. या निर्णयामुळे महिलांना राजकारणात प्रवेश मिळाला. परिणामी स्थानिक पातळीवर त्यांचे नेतृत्व विकसित झाले. अनेक अभ्यासांमधून असे दिसून आले, की महिला प्रतिनिधींनी पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजांवर अधिक लक्ष केंद्रित केले. त्यामुळेच केंद्र सरकार मांडत असलेले सध्याचे विधेयक महिला सक्षमीकरणासाठी मैलाचा दगड ठरत आहे; मात्र त्याची अंमलबजावणी घाईगडबडीत आणि व्यापक सहमतीशिवाय झाली, तर ते प्रादेशिक असंतोष, राजकीय तणाव आणि संघराज्यीय असमतोल वाढवू शकते. महिला आरक्षण विधेयक हा एक सामाजिक बदल आहे. लोकसंख्येच्या आधारावर प्रतिनिधित्वाचा समतोल राखताना कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही, हे पाहणे सरकारपुढील आव्हान आहे. पंतप्रधानांनी सभागृहात दिलेली 'निष्पक्ष परिसीमनाची हमी' आणि विरोधकांनी उपस्थित केलेले सामाजिक न्यायाचे मुद्दे यांचा सुवर्णमध्य साधला, तरच खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाही 'सर्वसमावेशक' ठरेल.

# सिनेमास्कोप

## करीना कपूर ट्रोल



बॉलिवूड अभिनेत्री करीना कपूर सध्या सोशल मीडियावर जोरदार ट्रोल होत आहे. मुंबई एअरपोर्टवरील तिचा एक व्हिडिओ समोर आला असून, त्यामध्ये ती रांग तोडून थेट चेकिंगसाठी पुढे जाताना दिसते. या घटनेमुळे अनेक नेटकऱ्यांनी तिच्यावर टीका केली आहे.

व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये दिसते की, एअरपोर्टवर इतर प्रवासी रांगेत उभे राहून आपला नंबर येण्याची वाट पाहत आहेत. मात्र करीना कपूर थेट पुढे जात चेकिंग बूथपर्यंत पोहोचते. ती आपले पासपोर्ट आणि ओळखपत्र दाखवून लगेच आत जाते. या वेळी इतर लोक मात्र रांगेतच थांबलेले दिसतात.

ही घटना पाहिल्यानंतर सोशल मीडियावर संतापाची लाट उसळली. अनेक युजर्सनी सेलिब्रिटींना मिळणाऱ्या विशेष वागणुकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. काहींनी स्पष्टपणे म्हटले की, एअरपोर्टसारख्या ठिकाणी सर्वांसाठी समान नियम असायला हवेत. या संपूर्ण प्रकरणावर अजूनही करीना कपूरकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, या व्हिडिओमुळे तिच्यावर टीकेची झोड उठली आहे. सोशल मीडियावर तिच्या वागणुकीवरून मोठी चर्चा सुरू आहे. दरम्यान, अलीकडेच करीना कपूर आयपीएल सामना पाहताना दिसली होती. ती आपल्या पती सैफ अली खान आणि मुलांसोबत मैदानावर उपस्थित होती. कामाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास, करीना कपूर याआधी २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या क्रू आणि सिंघम अगेन या चित्रपटांमध्ये झळकली होती. आता ती २०२६ मध्ये येणाऱ्या दायरा या चित्रपटात दिसणार आहे.

## तापसी पन्नूची दमदार फिल्म



अभिनेत्री तापसी पन्नूची कोर्टरूम ड्रामा फिल्म अस्सी आता ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. थिएटरमध्ये ही फिल्म पाहता न आलेल्या प्रेक्षकांसाठी ही एक चांगली संधी ठरणार आहे. कारण आता ही फिल्म घरबसल्या सहज पाहता येणार आहे.

अस्सी हा चित्रपट २० फेब्रुवारी २०२६ रोजी सिनेमागृहात प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाला समीक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला होता. विशेषतः तापसी पन्नूच्या अभिनयाचं खूप कौतुक करण्यात आलं. मात्र, चांगल्या प्रतिसादानंतरही हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपेक्षित कमाई करू शकला नाही.

आता जवळपास एक महिन्यानंतर हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर येत आहे. अस्सी हा चित्रपट १७ एप्रिल २०२६ पासून झी५ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर पाहायला मिळणार आहे.

या चित्रपटाची कथा खूप गंभीर आणि समाजाला विचार करायला लावणारी आहे. यात पितृसत्ताक व्यवस्था, समाजाची निष्काळजी वृत्ती, पीडित व्यक्तीला दोष देण्याची प्रवृत्ती आणि लैंगिक अत्याचारानंतरचा मानसिक त्रास यांसारख्या विषयांवर भाष्य करण्यात आलं आहे. त्यामुळे हा चित्रपट फक्त मनोरंजनापुरता मर्यादित नसून एक सामाजिक संदेशही देतो. या चित्रपटाचं दिग्दर्शन अनुभव सिन्हा यांनी केलं आहे. तसेच या चित्रपटाची कथा गौरव सोलंकी आणि अनुभव सिन्हा यांनी लिहिली आहे. निर्मिती भूषण कुमार, कृष्ण कुमार आणि अनुभव सिन्हा यांनी केली आहे.

अस्सीचा बजेट सुमारे ३० ते ४० कोटी रुपये असल्याचं सांगितलं जातं. मात्र, बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाला फारसं यश मिळालं नाही. या चित्रपटाने भारतात सुमारे ११.४४ कोटी रुपयांची कमाई केली, तर जगभरात १४.९३ कोटी रुपयांचा गल्ला जमवला. या चित्रपटात तापसी पन्नूसोबत कानी कुस्रुती, जीशान अय्यूब, कुमुद मिश्रा आणि रेवती यांसारखे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसतात.

## अभिनेत्री सुरभी ज्योतीचे मॅटर्निटी फोटोशूट



छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री सुरभी ज्योती लवकरच आई होणार आहे. लग्नानंतर सुमारे दीड वर्षांनी तिने आपल्या गरोदरपणाची माहिती चाहत्यांसोबत शेअर केली होती. ती सोशल मीडियावर अधूनमधून फोटो आणि व्हिडिओ शेअर करत आपल्या चाहत्यांना अपडेट देत असते.


नुकतेच तिने सोशल मीडियावर बेबी बंप फ्लॉन्ट करत तिचे काही फोटो शेअर केले आहेत, ज्यात ती अत्यंत ग्लॅमरस अंदाजात दिसत आहे. सुरभी सध्या आपली पहिली प्रेग्नंसी एन्जॉय करत असून तिने नुकतेच तिचे मॅटर्निटी फोटोशूट केले आहे.

या फोटोशूटसाठी तिने काळ्या रंगाचा बॉडीकॉन ड्रेस परिधान केला होता, ज्यात तिचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत होते. सोशल मीडियावर हे फोटो प्रचंड व्हायरल होत असून चाहते तिच्या या लूकवर कौतुकाचा वर्षाव करत आहेत.

विशेष म्हणजे सुरभी एक नाही, तर जुळ्या बाळांना जन्म देणार असल्याची चर्चा आहे. तिच्या बेबी बंपवरील फोटो पाहून चाहत्यांनी आधीच तर्क लावायला सुरुवात केली आहे.

सुरभीच्या करिअरबद्दल बोलायचे झाले तर, तिने अनेक लोकप्रिय मालिकांमध्ये काम केले आहे. १कुबूल है, १नागिन, १गुनाह आणि १कोई लौट के आया है या मालिकांमधून तिने प्रेक्षकांच्या मनात खास स्थान निर्माण केले आहे. तसेच काही वेबसीरिज आणि चित्रपटांमधूनही ती झळकली आहे.

## ऑपरेशन सिंदूरमध्ये वरुण धवनची एन्ट्री?



प्रसिद्ध दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. त्यांच्या नव्या चित्रपटाची घोषणा नुकतीच करण्यात आली असून या चित्रपटाचं नाव ऑपरेशन सिंदूर असं आहे. या चित्रपटाबद्दल सुरुवातीपासूनच प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. आता या चित्रपटाच्या स्टारकास्टबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या चित्रपटात मुख्य भूमिकेसाठी अभिनेता वरुण धवन याच्याशी चर्चा सुरू आहे. निर्माते आणि दिग्दर्शकांनी वरुणला या चित्रपटासाठी ऑफर दिली असून त्यालाही या विषयात रस असल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे तो या चित्रपटात मुख्य भूमिका साकारण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ऑपरेशन सिंदूर हा चित्रपट भारतीय सैन्याच्या एका खास मोहिमेवर आधारित असल्याचं सांगितलं जात आहे. या कथेत देशभक्ती, शौर्य आणि वास्तव घटनांचा प्रभाव दिसून येणार आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाची निर्मिती विवेक अग्निहोत्री हे भूषण कुमार यांच्या सहकार्याने करत आहेत. वरुण धवनने याआधी देशभक्तीवर आधारित चित्रपटांमध्ये काम करून प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. विशेषतः बॉर्डर २मधील त्याच्या भूमिकेचं खूप कौतुक झालं होतं. त्यामुळे अशा प्रकारच्या चित्रपटांसाठी त्याला सतत ऑफर्स मिळत आहेत. मात्र, तो प्रत्येक प्रोजेक्ट काळजीपूर्वक निवडत असल्याचंही सांगितलं जातं. सध्या वरुण धवन या चित्रपटाची संपूर्ण कथा ऐकणार आहे. त्यानंतरच तो या चित्रपटात काम करायचं की नाही, याबाबत अंतिम निर्णय घेईल. त्यामुळे चाहत्यांना त्याच्या निर्णयाची उत्सुकता लागली आहे.

## शक्ती मोहनने भूतकाळातील फसवणुकीवर केला खुलासा



डान्स इंडिया डान्स या रिॲलिटी शोची विजेती ठरल्यापासून शक्ती मोहनने आपल्या मेहनतीने मोठं नाव कमावलं आहे. आज ती एक यशस्वी कोरिओग्राफर, डान्स शोची परीक्षक आणि स्वतःचा डान्स स्टुडिओ चालवणारी उद्योजिका आहे. त्यामुळे ती आपल्या कामात पूर्णपणे समाधानी असल्याचं ती सांगते.

नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत, शक्ती तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल मनमोकळेपणाने बोलली. ती म्हणाली, लोक मला नेहमी लग्नाबद्दल विचारतात. माझे आई-वडीलही विचारतात की माझ्या आयुष्यात कोणी आहे का. पण मला वाटतं की, आयुष्यात आनंदी राहण्यासाठी कोणीतरी असायलाच हवं, हा समाजाचा गैरसमज आहे.

ती पुढे म्हणाली, मी माझ्या कामात खूप आनंदी आहे. माझ्या आयुष्यात काही कमी आहे असं मला अजिबात वाटत नाही. जर मला योग्य व्यक्ती भेटली, तर मी नक्कीच विचार करेन. पण फक्त समाजाच्या दबावामुळे लग्न करण्याची मला गरज वाटत नाही. मुलांबाबत बोलताना शक्तीने आणखी स्पष्ट भूमिका घेतली. ती म्हणाली, मी एक चांगली मावशी आहे आणि माझ्या भाच्यांवर खूप प्रेम करते. पण मला स्वतःची मुलं असावीत असं वाटत नाही. मला आई व्हायचं नाही. तिच्या या निर्णयामागे तिच्या भूतकाळातील रिलेशनशिपचा मोठा प्रभाव आहे. शक्तीने सांगितलं की, ती एका नात्यात होती, पण त्या नात्यात तिची फसवणूक झाली. जेव्हा मला कळलं की माझा जोडीदार माझी फसवणूक करत आहे, तेव्हा मी लगेचच ते नातं संपवलं. तो अनेक वेळा माफी मागायला आला, पण मी त्याला माफ केलं नाही, असं ती म्हणाली.

# विशेष वृत्त

## बीड शहरातील ३५८ दिव्यांग नागरिकांना निधी वितरण

**बीड (प्रतिनिधी):** शहरातील दिव्यांग नागरिकांसाठी नगरपरिषदेकडून स्व-उत्पन्नातून राखीव ठेवण्यात आलेल्या ५ टक्के दिव्यांग कल्याण निधीचे वितरण अखेर मार्गी लागले. येत्या दोन दिवसांत ३५८ लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात निधी जमा करण्यात येणार आहे. महिला व बालकल्याण सभापती आरती बनसोडे यांनी ही माहिती दिली. नगरपरिषदेकडील हा निधी वितरणाचा प्रस्ताव काही काळ रखडला होता. याबाबत मागील सभेत आ. विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली सभापती बनसोडे यांनी मुख्याधिकारी, नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळुक यांच्याकडे पाठपुरावा करून निधी वितरणाची मागणी केली होती. अखेर ही मागणी मंजूर करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सप्टेंबर २०२५ अखेर १८६ लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते, त्यांना निधी वर्ग करण्यात आला होता. त्यानंतर मार्च २०२६ अखेर एकूण ३५८ अर्ज प्राप्त झाले असून उर्वरित लाभार्थ्यांनाही आता निधी वितरित केला जाणार आहे. या निधी वितरण कार्यक्रमास नगराध्यक्ष पारवे ताई, उपनगराध्यक्ष मुळुक, सभापती शेख निजाम, उपसभापती बिलाल भाई, सभापती गुंजाळ, सभापती उड्डाण, सभापती सौदागर, मार्गदर्शक मुजीब भाई तसेच नगरसेवक उपस्थित राहणार असल्याचेही बनसोडे यांनी सांगितले. दिव्यांग नागरिकांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी हा निधी उपयुक्त ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली आहे.

## विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे केज येथे आयोजन

**केज (प्रतिनिधी):** येथील जीवन विकास शिक्षण मंडळ संचलित स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे दि. २०ते दि. २६ एप्रिल दरम्यान स्वामी विवेकानंद विद्या मंदिर (माध्यमिक विभाग) येथे सांय. ७ ते ८:३० या दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेने या वर्षी २६ व्या वर्षात पदार्पण केले आहे. व्याख्यानमालेची सुरुवात दि. २० एप्रिल रोजी कवी प्रणव महाराज पटवारी व केशव महाराज शास्त्री, भगवान श्रीकृष्ण आश्रम यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने होणार आहे. प्रणव महाराज पटवारी यांचे वर्तमान युगातील संतवाङ्ख्याची प्रासंगिकता या विषयावर व्याख्यान होणार आहे. दि.२१ एप्रिल रोजी उदय देवळाणकर यांचे शेती आणि माती या विषयावर व्याख्यान होईल. दि.२२ एप्रिल रोजी डॉ. मधुश्री संजीव सावजी यांचे महिला सक्षम असतातच या विषयावर तर दि.२३ एप्रिल डॉ. राम जावळे यांचे व्याख्यान होईल. दि.२४ एप्रिल रोजी प्राचार्य सोमनाथ रोडे यांचे जाती तोडो भारत जोडो या विषयावर व्याख्यान होईल. दि.२५ एप्रिल रोजी बापू सर्वगोड यांचे भारतीय चित्रपट सृष्टी बदलती निर्मिती आणि प्रेक्षकांच्या अभिरुचीचा प्रवास, व दि.२६ एप्रिल रोजी विलास बडे यांचे युद्धजन्य परिस्थितीत माध्यमांची भूमिका या विषयावर व्याख्यान होईल.

## जीवनगौरव पुरस्काराने घाडगे सन्मानित

**बीड (प्रतिनिधी):** मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष तथा राज्यातील शिक्षक चळवळीचे नेते पी. एस. घाडगे यांना प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे जीवनगौरव-२०२६' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्राचार्य डॉक्टर विठ्ठल मोरे समाज विज्ञान फौंडेशन तर्फे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यास 'प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे जीवनगौरव' पुरस्कार दिला जातो. यावर्षीचा पुरस्कार मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष पी.एस. घाडगे यांना देण्यात आला. मंगळवार दि.१४ एप्रिल रोजी प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे याच्या स्मृतिदिनी शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी येथे प्राचार्य कुसुमताई मोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या शानदार कार्यक्रमात, महाराष्ट्रातील ख्यातनाम साहित्यिक कवी व लेखक इंद्रजित भालेराव यांच्या हस्ते घाडगे यांना प्राचार्य विठ्ठल मोरे जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## श्री स्वामी समर्थ केंद्रात नामजप यज्ञ सप्ताहाची सांगता



**बीड (प्रतिनिधी)** शहरातील आदर्श नगर येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रामध्ये श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड नामजप यज्ञ सप्ताह आणि सामूहिक गुरुचरित्र पारायणाची बुधवारी (दि.१५) सकाळी महाआरती व महाप्रसादाने उत्साहात सांगता झाली. या सप्ताहाचा पंचक्रोशीतील अनेक भाविकांनी याचा लाभ घेतला. सप्ताह काळात अनेक सेवेकऱ्यांनी गुरुचरित्र ग्रंथ पारायण केले. सप्ताह काळात अखंड नामजप, गायत्रीमंत्र, नवार्णव मंत्र, महामृत्युंजय मंत्र, स्वामी समर्थ मंत्राचा जयघोष सुरू होता. याबरोबरच श्रीगणेश याग, मनोबोध याग, रुद्र याग, स्वामी याग, मल्हारीयाग, चंडी याग या सारख्या अतिउच्च सेवे मध्येही असंख्य भाविकांनी सहभाग नोंदवला. सप्ताह काळात विविध अठरा विषयावर जेष्ठ सेवेकऱ्यानी मार्गदर्शन करून स्वामी समर्थ सेवा मार्गमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले.

## धारुर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात

**धारूर (प्रतिनिधी):** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात उत्सव समितीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी महात्मा फुले चौक येथे नगराध्यक्ष बालासाहेब जाधव यांच्या हस्ते पंचशील निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी तहसीलदार श्रीकांत निळे, सहायक निरीक्षक देविदास वाघमोडे, सर्व नगरसेवक, उत्सव समितीचे पदाधिकारी, अधिकारी वर्ग तसेच शहरातील सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर वीर पांडुरंग चौक येथे तहसीलदार श्रीकांत निळे यांच्या हस्ते तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आबेडकर चौकात सहायक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे याचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन उत्सव समिती अध्यक्ष लक्ष्मण सिरसट यानी केले. याच अनुषंगाने शहरातून दुचाकी रॅली काढण्यात आली. सायंकाळी विविध पथकांच्या सहभागातून आकर्षक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.

# पुस्तकी ज्ञानासोबतच उत्तम आरोग्याची कास धरा-डॉ. आदिती सारडा



**बीड (प्रतिनिधी):-** यशस्वी आयुष्यासाठी केवळ पुस्तकी अभ्यास पुरेसा नाही, तर शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ असणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी अभ्यासासोबतच दैनंदिन जीवनात आरोग्याला प्राथमिक महत्त्व द्यावे, असे आवाहन आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले.

जागतिक आरोग्य दिनानिमित्त आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष जनजागृती कार्यक्रम घेतला. आदित्य नर्सिंग शाखेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या संकुलात हा सोहळा

पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. आदिती सारडा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर आदित्य आयुर्वेदिक शाखेचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, आदित्य नर्सिंग शाखे प्राचार्य विकास गर्जे आणि आदित्य शाखेचे प्राचार्य डॉ. राहल खडके यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य विकास गर्जे यांनी आरोग्य दिनाचे महत्य विशद केले. आरोग्यासाठी एकत्र विज्ञानाच्या पाठीशी उभे राहा हा संदेश देत त्यांनी विज्ञानाची साथ घरून आरोग्य जपण्याचे आवाहन केले. संस्थेच्या प्रगतीमध्ये आणि विद्यार्थ्यांच्या वशामध्ये डॉ. आदिती सारडा यांचे मार्गदर्शन नेहमीच प्रेरणादायी ठरत असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. डॉ. आदिती सारडा यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला.त्या म्हणाल्या की, आजच्या धावपळीच्या युगात आरोग्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, शिस्तबद्ध जीवनशैली आणि आरोग्याप्रती जागरूकता हीच यशाची पहिली पायरी आहे. सुमारे एक तास चाललेल्या या कार्यक्रमाला महाविद्यालयातील २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली होती. त्यामध्ये सीपीआर या विषयावर आदित्य नर्सिंग शाखेच्या साक्षी भोजने, निकीता घाडगे जयश्री भांगे, आरती कांबळे, गोकरना बडवने, अनुजा देवगुडे, हर्षदा वळवी यांनी मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये सीपीआर या विषयावर पथनाटच देखील सादर केले. त्यात विद्यार्थ्यांनी आणीबाणी मधे सीपीआर कसा द्यायचा यावर उत्कृष्ट प्रदर्शन केले. पीकॉस

या विषयावर नामदेव जाधव व सुहास भांडवलावर वा विद्यार्थ्याने माहिती दिली. पीकॉस हा एक सामान्य श्रिरोग असून हार्मोन्स संतुलित नसल्याने हा आजार होतो त्यामुळे वरंधत्व होऊ शकते. तसेच नियमित व्यायाम आणि योग्य आहार घेऊन आपण ते टाकु शकतो, त्यावर उपचार करू शकतो, असे विद्यार्थ्यांनी सांगत आरोग्य विषयी जागरूकता निर्माण केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्राचार्य विकास गर्जे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदित्य नर्सिंग महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी विविध विभागांचे प्रमुख आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्तृत्वाची उंची गाठण्यासाठी डॉ.आंबेडकरांचे चरित्र अभ्यासावे-ॲड सुभाष निकम




**गेवराई (प्रतिनिधी):-** अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ज्ञान, यश आणि कर्तृत्वाची उंची गाठण्यासाठी विद्यार्थ्यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनचरित्र अभ्यासावे. निश्चितच यश मिळेल, असे प्रतिपादन जेष्ठ अभ्यासक सत्यशोधक ड सुभाष निकम यांनी केले.

गढी येथील पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात १४ एप्रिल रोजी आयोजित अभिवादन सभेत ॲड सुभाष निकम बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य विजयकुमार भोस होते. प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लब ऑफ गेवराईचे अध्यक्ष प्रा राजेंद्र बरकसे, सत्यशोधक प्रभाकर घोडके, उपप्राचार्य सुधाकर वाघमारे उपस्थित होते. सुरुवातीस डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांनी भीमगीत व स्वागत गीत सादर केले. उपस्थितांचे स्वागतानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब यांच्याबद्दल आपली मनोगते व्यक्त केली. ठाकूर सर यांनी डॉ बाबासाहेब यांच्यावर आधारित गीत गायले. आपल्या प्रमुख भाषणात ड सुभाष निकम यांनी जीवनात येणारी संकट, दुस्वास तसेच विरोधालाही न जुमानता एकनिष्ठता आणि कठोर परिश्रमामुळे अपेक्षित यशाची उंची गाठता येते, ही शिकवण बाबासाहेबांच्या जीवनकार्या वरून दिसून येते. अखंडपणे ज्ञानाचा ध्यास हा त्यांचा अनमोल गुण होता. अहोरात्र प्रयत्न करुन बाबासाहेबांनी भारताचे संविधान लिहिले आहे जे जगातील सर्वश्रेष्ठ संविधान मानले जाते. त्यांचा अनेक विषय व भाषांचा गाढा अभ्यास होता. मानवतेच्या व स्वातंत्र्याच्या संगोपनाचा व संरक्षणाचा अप्रतिम व अनमोल दस्तावेज म्हणजे भारतीय संविधान होय. रिजर्व बँकेची स्थापना, हिंदू कोडबील, कामगार, महिला यांच्यासंबंधी विविध कायदे तसेच प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार ही बाबासाहेबांची विशेष देन आहे. शिवरायांची स्वराज्याची संकल्पना, महात्मा फुलेंचा सामाजिक समतेचा संदेश, राजर्षि शाहू महाराजांची आरक्षणाची मुहर्तमेढ या सर्व आदर्श विचारांचे प्रतिबिंब आपणास संविधानामध्ये पहायला मिळते, असे प्रतिपादन त्यांनी केली. यावेळी प्रा राजेंद्र बरकसे व प्राचार्य भोस यांनी समयोचित मार्गदर्शन केले. आभार उपप्राचार्य सुधाकर वाघमारे यांनी मानले. यावेळी विद्यार्थ्यांनी भीमगीतावर आधारित नृत्य व लघुनाटिका सादर केली. जयंती उत्सवानिमित्त सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## महेश सेवा संघ व समस्त राजस्थानी परिवाराच्यावतीने जम्मा जागरण

**बीड (प्रतिनिधी):-** अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहर्तावर रविवारी (दि.१९) महेश सेवा संघ, बीड आणि सकल राजस्थानी समाज बीड यांच्या वतीने आराध्यदैवत बाबा रामदेवजी यांच्या जम्मा जागरण कार्यक्रमाचे स्वरूपात आयोजन करण्यात आले आहे.

हैद्राबाद येथील प्रख्यात भजनसम्राट श्री. अनिरुध्द जी दुनिवाले यांच्या सुमधुर वाणीतून हा कार्यक्रम आयोजित होणार आहे. हा कार्यक्रम माँ वैष्णो पॅलेस बीड येथे संपन्न होणार आहे. रविवारी सायंकाळी ६:३० ते रात्री ८ ही सर्वांसाठी महाप्रसाद ची वेळ तर जम्मा जागरण रात्री ८ वाजल्यापासून सुरू होणार आहे. कार्यक्रमासाठी जिल्हाभरातून राजस्थानी समाज एकत्रित येणार असून भव्य दिव्य नियोजनाची कमान महेश सेवा संघाचे सर्व सदस्य आणि राजस्थानी समाजातील सर्व सामाजिक मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी घेतली आहे. या कार्यक्रमासाठी राजस्थानी समाजातील बांधवांनी तसेच रामदेव बाबांच्या भक्तांनी सहपरिवार अवश्य उपस्थित रहावे असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष डॉ. संकेत बाहेती, सचिव श्री. आनंद बाहेती या सह सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी केले आहे.

## तुलसी महाविद्यालयात अभिवादन

**बीड (प्रतिनिधी):** येथील देवगिरी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त आयोजित कार्यक्रमात महामानवाच्या विचारांना उजाळा देत त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्रा.डी.जी निकाळजे, प्रा. अर्जुन राठोड यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या अभिवादन सोहळ्याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभागांचे प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी पुष्प अर्पण करून महामानवाच्या स्मृतीस वंदन केले.

## भीमजयंतीनिमित्त शिरुरमध्ये रॅली



**शिरुर (प्रतिनिधी):-** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती शिरूर कासार तालुक्यात मोठ्या उत्साहात आणि चैतन्याच्या वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने शहरातून भव्य रॅली काढण्यात आली होती, ज्यामध्ये हजारो भीमसैनिकांनी निळ्या निशाणासह सहभाग नोंदवला. शौर्यगाथा आणि कार्याचा गौरव या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनप्रवासावर आधारित निघालेली भव्य मिरवणूक. बाबासाहेबांनी केवळ पुस्तकी ज्ञान मिळवले नाही, तर त्या ज्ञानाच्या जोरावर दलितांच्या आयुष्यात प्रकाशाची ज्योत पेटवली. महाडचा चवदार तळे सत्याग्रह असो व काळाराम मंदिर प्रवेश, बाबासाहेबांनी समतेसाठी दिलेला लढा ही आधुनिक भारताची एक महान अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याचे बळ त्यांनी कोट्यवधी जनतेला दिले, अशा शब्दांत त्यांचा गौरव करण्यात आला. 'शौर्यगाथा' आहे. शिवसेना तालुकाप्रमुख सोपान मोरे व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर यांचेसह मान्यवरांनी आपले विचार मांडले. या जयंती महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित सभेत तालुकाप्रमुख सोपान मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मेहबूब शेख, दादासाहेब मुंडे, अरुण भालेराव, बाबुराव झिरपे, प्रकाश बडे यांच्यासह उपस्थित होते.

# जिल्हा रुग्णालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी



**बीड (प्रतिनिधी):-** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती बीड जिल्हा रुग्णालयात उत्साहात साजरी करण्यात आली व डॉ. बाबासाहेबाना अभिवादन करण्यात आले. संविधान फॉउंडेशन बीड कर्मचारी यांच्याकडून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खुप वर्षानंतर जिल्हा रुग्णालतात मोठ्या थाटामाटात जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या मोलाच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने जयंती साजरी करण्याच भाग्य जिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना लाभले यावेळी मोठ्यां साख्येने कर्मचारी वर्ग व विद्यार्थिनी उपस्थित होते. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळुंके यांनी अध्यक्ष स्थान भूषविले तर प्रमुख पाहूणे अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ नागेश चव्हाण, अधिसेविका डॉ. रमा गिरी सहाय्यक अधिसेविका, संगीता महानवार, डॉ पल्लवी पंडित, समाजसेविका सुनीता मिसाळ उपप्राचार्य उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तथागत भगवान बुद्ध यांच्या चरणी पुष्प अर्पण केले. बुद्धवंदना घेण्यात आली छोट्या मुलींनी नृत्य सादर केली तसेच विद्यार्थिनींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध कार्यावर गौरवास्पद भाषणे केली. अध्यक्षीय भाषणात जिल्हा शल्य चिकित्सक यांनी सांगितले की, तुमच्याकडे ज्ञान आणि कर्तृत्व असेल तर जातं पात कोणी बघत नाही. विद्यार्थीनिनो तुम्ही उद्याचे भविष्य आहात नवीन टेकॉनॉलॉजीचा वापर आपल्या ज्ञानात भर घालण्यासाठी करा, महापुरुषांनी स्त्रीयांना रूढी परपरेतून मुक्त करण्यासाठी महान कार्य केले, त्याचे हक्क आणि अधिकार त्यांना मिळालेच पाहिजे. आपण रुग्णांसाठी काम करतो, सेवा करण्याची चांगली संधी मिळालेली आहे. चांगली रुग्ण सेवा देण्याचा प्रयत्न केला पाहिजे, रुग्ण सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. आपण समाजाच्या उपयोगी पडले पाहिजे, आपला खारीचा वाटा उचलला पाहिजे. डॉ बाबासाहेबांनी समाजासाठी खुप मोठे कार्य केले आहे आणि ते आपलेच नाही तर सर्वांचेच बाप आहेत कार्यक्रमाला नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकवर्ग उपस्थित होते. मुक्ता पवार, प्रतीक जोशी, अजय ढाकणे व इन्चार्ज सिस्टर रंजना दाणे, संगीता जोगदंड, कांबळे सुनंदा, सीमा दुबे, उबाळे, आम्रपाली बनसोडे, सुनीता सोनवणे, शीला मुंडे, परिचारिका संघटनेच्या अध्यक्षा तसेच रेखा वनवे, वीणा करंदीकर, उल्का साळवे, सोनाली कांबळे, रेणुका वाघ, रेखा थोरात व कार्यालयातील अधिकारी सुपेकर हजर होतें सूत्रसंचलन श्रीपाल ससाणे यांनी केले तर आभारप्रदर्शन सुनीता पाटील यांनी केलें फॉउंडेशनचे पदाधिकारी चंद्रकला सुतार, नयना नरहिरे, प्रशांत सुकाळे, बापू निकाळजे, स्नेहा बचूटे, रवी साठे, रेश्मा कांबळे, अनिता धनवे, मुंजा पानझडे, किशोर बिरलीगे, सविता बेदरे, प्रतिभा औसरमल, कविता वाव्हळ, रोडे सुनीता, मुने अल्का, रेणुका, शाहीन शेख सायरा शेख, रेखा पवळे, वनिता नवले, शारदा गायकवाड, सुषमा वडमारे, असलम इत्यादी उपस्थित होते.

# थर्ड पार्टी मॉनिटरिंगच्या माध्यमातून प्रदूषण नियंत्रणाची काटेकोर अंमलबजावणी करणार-ना.पंकजाताई मुंडे

## विधानसभेत दिलेल्या आश्वासनाची पूर्ती ; मुंबईत घेणार आढावा बैठक

चंद्रपूर (सरकार) जिल्ह्यातील प्रदूषणाच्या गंभीर प्रश्नावर विधानसभेत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेसह विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत आज चंद्रपूर जिल्ह्यात सविस्तर प्रदूषण पाहणी दौरा केला. या दौऱ्यामुळे चंद्रपूरच्या प्रदूषण प्रश्नावर राज्य सरकारची ठोस भूमिका आणि पुढील कारवाईची दिशा स्पष्ट झाली आहे.




या पाहणी दौऱ्यादरम्यान मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आ मुनगंटीवार यांच्या सह ऊर्जानगर वसाहत परिसरात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड आणि चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्र यांच्या कोळसा हाताळणी प्रकल्प व कोळसा बंकरमुळे निर्माण होणारे प्रदूषण प्रत्यक्ष पाहिले. उघड्यावरून वाहून नेला जाणारा कोळसा, हवेत उडणारी राख व धूर यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी निरीक्षण केले.

यानंतर त्यांनी बेलसणी परिसरातील कोल वॉशरीजमुळे होणाऱ्या प्रदूषणाची पाहणी केली. शेतकऱ्यांच्या शेतांवर पडणारी कोळशाची धूळ, पिकांचे नुकसान आणि जमिनीची होत असलेली हानी याबाबत स्थानिकांनी मांडलेल्या समस्या त्यांनी ऐकून घेतल्या. झरपट नदी परिसरातही जाऊन त्यांनी नदीतील प्रदूषण, गाळ साचणे आणि पाण्याच्या गुणवत्तेतील घसरण याचा आढावा घेतला.

पाहणी दौऱ्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आभार मानत अत्यंत ठोस व परिणामकारक मागण्या मांडल्या. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, केवळ पाहणीपुरते मर्यादित न राहता या बैठकीचे इतिवृत्त तातडीने अंतिम करून मुंबईत उच्चस्तरीय आढावा बैठक घ्यावी, जेणेकरून निर्णयांची अंमलबजावणी वेळेत होईल.

कोल वॉशरीजमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, तहसीलदार, कृषी विभाग व प्रदूषण नियंत्रण विभागाच्या संयुक्त समितीने दिलेल्या अहवालानुसार तातडीने नुकसानभरपाई देणे आवश्यक आहे, अशी ठाम मागणी त्यांनी केली. यासोबतच प्रदूषण नियंत्रण विभागातील काही अधिकाऱ्यांना संबंधित कायद्याचे पुरेसे ज्ञान नसल्याचे निदर्शनास आणून देत, सक्षम व तज्ज्ञ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

झरपट नदीच्या पुनरुज्जीवनासाठी पहिल्या टप्प्यात डीपीआर तयार करण्यासाठी 'निरी' या संस्थेला तातडीने सूचना द्याव्यात तसेच आयआयटी पवई व निरी यांच्या संयुक्त समितीकडून प्रदूषणाबाबत तीन महिन्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

बैठकीत बोलताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी अत्यंत स्पष्ट शब्दांत सांगितले की, चंद्रपूरमध्ये प्रदूषणाची तीव्रता प्रचंड आहे, हे आज प्रत्यक्ष पाहणीदरम्यान जाणवले. काही ठिकाणी प्रदूषण लपवण्याचा प्रयत्न होत असल्याचेही दिसून आले; मात्र प्रदूषण लपवून चालणार नाही, अशा प्रकारांना आम्ही अजिबात सहन करणार नाही.शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असताना त्यांना नुकसानभरपाई न देण्याचा प्रकार गंभीर असून तो खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. दौऱ्यात दिलेल्या सर्व सूचनांची ठराविक कालमर्यादेत अंमलबजावणी होईल यावर स्वतः लक्ष ठेवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, तसेच थर्ड पार्टी मॉनिटरिंगद्वारे प्रदूषण नियंत्रणाची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, असे सांगत त्यांनी प्रशासनाला स्पष्ट संदेश दिला.

झरपट नदीच्या खोलीकरण व सौंदर्यीकरणासाठी महानगरपालिकेने तातडीने पावले उचलावीत, तसेच नदी पुनर्जीवन प्राधिकरण स्थापन होताच इरई व झरपट या नद्यांचा पहिल्या टप्प्यात समावेश करण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी केली.या बैठकीस जिल्हाधिकारी वसूमना पंत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, महापौर संगीता खांडेकर, मनपा आयुक्त आकुनोरी नरेश तसेच राहुल पावडे, बंडू गौरकर आदींची उपस्थिती होती.चंद्रपूरच्या प्रदूषणाच्या प्रश्नावर आता केवळ चर्चा न राहता ठोस कृतीकडे वाटचाल सुरू झाल्याचे या दौऱ्यामुळे स्पष्ट झाले आहे.

# बीड जिल्ह्यात १७७३ रुग्णांना सुमारे १३.६९ कोटीची मदत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

बीड (सरकार): शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. बीड जिल्ह्यात आर्थिक वर्षात १७७३ रुग्णांना सुमारे १३ कोटी ६९ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग



(केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत बीड जिल्ह्यातील १७७३ रुग्णांना सुमारे १३ कोटी ६९ लाख ३३ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

रूग्ण व नातेवाईकांची होणारी धावपळ लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्ष, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, सामंजस्य करार आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यातून रूग्णांना वेळेत अर्थसहाय्य होत आहे. गरजू रूग्णांनी योजनेचा लाभ घेण्याकरिता आणि अधिक माहितीकरिता १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

## स्वा सावरकर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात इ. ११ वी प्रवेश नोंदणी मदत कक्ष

बीड (सरकार) शैक्षणिक वर्ष २०२६ -२७ साठी शासानाने इ ११ वी प्रवेश प्रक्रिया online सुरू केली आहे यावर्षी सर्व विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन (नोदंणी) करणे कला विज्ञान शाखेत प्रवेशासाठी अनिवार्य आहे.

स्वा सावरकर मा उमा विद्यालयात प्रवेश प्रक्रिया नोंदणी करणे परत कक्ष स्थापन केला आहे संपर्क सकाळी १० ते १२.०० या वेळेत विद्यालयात विद्यार्थ्यानी संपर्क करावा . विद्यार्थ्यांनी सोबत हॉलतिकीट संपर्क क्रमांक मेल आयडी आवश्यक आहे तरी विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य प्रा चंद्रकांत मुळे , उमेश जगताप उपमुख्याध्यापक , प्रा बाळासाहेब साळवे प्रा दीपाली लोहिया प्रा दीपक देशमुख , प्रा संतोष जोशी प्रा मोदाळे सर्व प्राध्यापक वृंद यांनी केले आहे.

# भाजपचे नगरसेवक पती सागर देशपांडे यांच्या कुटुंबियांवरील खोटे गुन्हे मागे घ्या

## भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह शिष्टमंडळ एसपींच्या भेटीला

बीड (सरकार)शहरातील धोंडीपुरा भागातील भाजपच्या नगरसेविका भाग्यश्री देशपांडे यांचे पती सागर देशपांडे यांच्यावर काही दिवसांपूर्वी झालेल्या भ्याड हल्ल्यानंतर, त्यांच्यासह कुटुंबीयांवर दाखल करण्यात आलेले खोटे गुन्हे तत्काळ मागे घ्यावेत, अशी मागणी भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने गुरुवारी (दि.१६) पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे केली.




पुढे म्हटले आहे की, आरोपींकडून सागर देशपांडे यांच्यासह त्यांचे वडील अरुणराव देशपांडे यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर देशपांडे कुटुंबियांसह भाजपचे पदाधिकारी पोलीस अधीक्षकांची भेट घेण्यासाठी गेले होते. यावेळी भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, शहराध्यक्ष अशोक लोढा, संपादक दिलीप खिस्ती, ज्येष्ठ पत्रकार महेश वाघमारे, नगरसेवक जगदीश गुरखुदे, शुभम धूत, डॉ.रविंद्र घुंबरे, अॅड. संगीता धसे, अॅड. दीपक कुलकर्णी, प्रमोद पुसरेकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. माध्यमांशी बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले की, सागर देशपांडे यांच्यावर झालेला हल्ला हा राजकीय वैमनस्यातून झाला आहे. देशपांडे कुटुंबाची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नसताना त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घटनेचे स्पष्ट सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असूनही संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली नाही, ही बाब चिंताजनक आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे हा प्रकार निदर्शनास आणून देण्यात आला असून, न्याय मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# राजेगाव ग्रामपंचायतीचा स्तुत्य उपक्रम

## गावात जन्मलेल्या पहिल्या मुलीच्या नावाने ५ हजारांची सुकन्या योजना

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या वाढदिवसानिमित्त पहिली ठेव

बीड (सरकार)मुलींचा जन्मदर वाढावा आणि त्यांच्या भविष्याची आर्थिक सुरक्षितता सुनिश्चित व्हावी या उद्देशाने राजेगाव ग्रामपंचायतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या वाढदिवसा निमित्त घेतलेल्या ठरावाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली असून, गावातील पहिल्या लाभार्थी मुलीच्या नावाने सुकन्या योजनेत ठेव करण्यात आली.

लोकनेते स्व. विनायकराव मेटे यांनी मुलींच्या सक्षमीकरणासाठी राबवलेल्या विविध उपक्रमांच्या प्रेरणेने त्यांच्या जन्मगावी राजेगाव येथे हा अभिनव निर्णय घेण्यात आला होता. ग्रामपंचायत राजेगाव येथे १ एप्रिल २०२५ रोजी तत्कालीन सरपंच अॅड. प्रवीण मेटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मासिक बैठकीत हा महत्त्वपूर्ण ठराव एकमताने मंजूर करण्यात आला होता.

या ठरावानुसार, १ एप्रिल २०२५ नंतर गावात जन्मलेल्या प्रत्येक मुलीच्या नावाने ग्रामपंचायतीच्या वतीने ५ हजार रुपये फिक्स डिपॉझिट किंवा सुकन्या समृद्धी योजनेत जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामपंचायत आता गावात जन्माला आलेल्या प्रत्येक मुलीच्या नावे बँकेत रक्कम ठेवी स्वरूपात ठेवणार आहे. यासाठी डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी ग्रामपंचायती कडे या योजनेसाठी लागणारी रक्कम धनादेशा द्वारे जमा केली आहे.

दरम्यान, या ठरावाची पूर्तता करत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य आणि शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या वाढदिवसानिमित्त गावातील मंगेश सर्जेराव मेटे यांच्या कन्या श्रीजा मंगेश मेटे हिच्या नावाने पोस्ट ऑफिसमध्ये सुकन्या समृद्धी योजनेत ५ हजार रुपये जमा करण्यात आले. हीच या उपक्रमाची पहिली अंमलबजावणी ठरली आहे. या उपक्रमामुळे मुलींच्या जन्माला प्रोत्साहन मिळून त्यांच्या शिक्षण व भविष्यासाठी आर्थिक भक्कम पाया तयार होणार असल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. गावपातळीवर राबविण्यात येणारा हा उपक्रम इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.

# डॉ.आंबेडकरांनी बहिष्कृतांच्या जीवनात आत्मसन्मानाचे बीज पेरले- डॉ.सतीश साळुंके

बीड (सरकार) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पिढ्यानपिढ्या बहिष्कृत असणाऱ्या वंचित अस्पृश्यांच्या हृदयात आत्मसन्मानाचे बीज पेरून चातुर्वर्ण व्यवस्थेविरुद्ध दोन हात करण्याची प्रेरणा दिली असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ .सतीश साळुंके यांनी केले. छत्रपती संभाजीनगर येथे सामान्य न्याय व समाज कल्याण विभागाच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समारंभात डॉ. साळुंके बोलत होते.

याप्रसंगी समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त दीपक खरात, सहाय्यक आयुक्त रवींद्र शिंदे, व्हीजेएनटी विभागाचे उपसंचालक जलील शेख आणि जात पडताळणी विभागाच्या उपायुक्त श्रीमती मकरंद आदी मान्यवर उपस्थित होते. आरंभी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. साळुंके आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, महात्मा ज्योतिराव फुले यांनी धार्मिक कर्मकांडामुळे शेतकऱ्यांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवला. राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाचे सार्वत्रिकरण करून उपेक्षितांच्या घरात शिक्षणाची गंगा नेली तर गाडगेबाबांनी धार्मिक दांभिकाविरुद्ध आवाज उठून देवाला मानव सेवेत पाहिले. फुले,शाहू आंबेडकर, हे विचार सूत्र कर्मवीर गाडगेबाबांच्या नावाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संबंध हे अतिउच्च पातळीचे होते. डॉ. आंबेडकरांनी लिहिलेले संविधान हे कोणत्याही धर्मग्रंथापेक्षा श्रेष्ठ ठरायला हवे. धर्मग्रंथ हे मानवी आचरणाचे मार्गदर्शक असतात तर या आचरणाला कायद्याचे दिग्दर्शन संविधान करते. महाराष्ट्र खरंच फुले- शाहू -आंबेडकर -गाडगेबाबांचा आहे का? असा प्रश्न उपस्थित करून ते म्हणाले की, ज्या राज्यात हजारो शेतकरी आत्महत्या करतात तो महाराष्ट्र फुलेंचा कसा? ज्या राज्यात दलितांवर प्रचंड अन्याय होतोय आजही गाव पातळी अस्पृश्यतेची भावना आहे. संविधान मूल्यांना पादळी तुडवलं जात आहे तो महाराष्ट्र आंबेडकरांचा कसा? ज्या राज्यात गोरगरिबांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याच्या षडयंत्रापोटी खाजगी इंग्रजी शाळांमधून लाखो रुपये फीस लाटली जाते ते राज्य शाहूंचे कसे? ज्या राज्यात गल्लोगल्ली भोंदू बाबा जन्मतात ते राज्य गाडगेबाबांचे कसे? समाजात समता शांतता, बंधुत्व व राष्ट्रीयएकात्मता ठेवायची असेल तर या महामानवांच्या विचाराशिवाय पर्याय नाही. कार्यक्रमांमध्ये विविध लाभार्थ्यांना डॉ. साळुंके यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आली.

# महात्मा फुलेंच्या जयंतीनिमित्त शालेय साहित्य वाटप

शिरूर कासार (सरकार): स्त्री शिक्षणाचे आद्य जनक, ज्यांनी पहिली मुली, महिलांसाठी शाळा निर्माण करुन मुली व महिलांच्या शिक्षणाची द्वारे खुली केली असे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त हिवरसिंगा येथील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेत शुक्रवार (दि.१७)रोजी शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले.



शिरूर कासार तालुक्यातील हिवरसिंगा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत स्त्री शिक्षणाचे आद्य जनक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त ५० लेझीम,एक मोठा ढोल,एक ताश,एक झाँज,एक पिपाणी असे शाळेसाठी उपयुक्त असणारे वाद्ये,शालेय साहित्य शुक्रवार (दि.१७) रोजी शाळेला भेट देण्यात आले.जयंतीच्या वर्गणीतून जमा झालेल्या रकमेतुन हे शालेय साहित्य खरेदी करण्यात आले.एक चांगला उपक्रम हाती घेतल्याचे शिक्षकांनी जयंती उत्सव समितीचे आभार मानत कौतुक केले.यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष धर्मराज दुधाळ,उपाध्यक्ष अनिकेत सानप,अमोल दुधाळ,सिद्धेश्वर दुधाळ,बालाजी गवळी,दीपक,दुधाळ,सोमेश टाकसाळ,मुकुंद वाकळे,रामकिसन दुधाळ,रवी दुधाळ,गणेश मुळे,शाम दुधाळ,अशोक देवकर तसेच शाळेतील शिक्षक दुधाळ दत्तात्रय, घोरड अतुल, मिसाळ अरुण, कदम संदीप, शिक्षिका बडवे कविता, खेत्रे सावित्रा, राख वर्षा, जेधे सुशीला यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राक्षसभुवनचा चेहरामोहरा बदलतोय

## उपसरपंच तात्यासाहेब नाटकर यांची धडाकेबाज कामगिरी!

गेवराई (सरकार): तालुक्यातील राक्षसभुवन शनिचे गावाच्या विकासाला आता अक्षरशः पंख लागले असून, उपसरपंच तात्यासाहेब नाटकर यांच्या पुढाकारातून गावाचा चेहरामोहरा झपाट्याने बदलताना दिसत आहे. अनेक दिवसांपासून रखडलेली गावांतर्गत रस्त्यांची कामे आता वेगाने मार्गी लागत असून, सर्वत्र सिमेंट रस्त्यांचे जाळे उभे राहत आहे.



गावातील मुख्य रस्ते आणि अंतर्गत गल्ल्यांची अवस्था पावसामुळे चिखलमय व खड्डेमय झाली होती. वाहनचालकांसह पादचाऱ्यांना रोजच्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत होत्या. मात्र, या समस्येला कायमचा पूर्णविराम देण्याचा निर्धार करत उपसरपंच तात्यासाहेब नाटकर यांनी तातडीने पाठपुरावा करत कामाला सुरुवात करून दिली. आज परिस्थिती पूर्णपणे बदलताना दिसत आहे. सिमेंट रस्त्यांमुळे गावकऱ्यांचा प्रवास सुखकर झाला असून, नागरिकांमध्ये समाधानाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कामाचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी स्वतः उपसरपंच नाटकर रस्त्यावर उभे राहून कामाची पाहणी करत असल्याने ठेकेदारांवरही योग्य नियंत्रण राहिले आहे. कामात कुठलाही हलगर्जीपणा चालणार नाही असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला आहे.

याचबरोबर, आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली उर्वरित विकासकामेही लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

### गावकऱ्यांची प्रतिक्रिया काय?

आता आमच्या गावात चिखल नाही, धूळ नाही रस्ते चकाचक झालेत. हीच खरी विकासाची कामगिरी! अशा शब्दांत ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. एकूणच, राक्षसभुवनमध्ये विकासाची गंगा वाहू लागली असून, उपसरपंच तात्यासाहेब नाटकर यांच्या कामाची चर्चा सध्या पंचक्रोशीत रंगू लागली आहे

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)